Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 1.7604(UIF)
Volume-3, Issue- 2, March -2013 Available online at www. isrj.in

# भारतीय लोकशाही : कायद्याचे राज्य

**देवलाल सुखदेवराव आठवले**

श्रीमती को.गा.म.महा.दर्यापूर, अमरावती

**प्रस्तावना :-**

भारतातील लोकशाही व कायद्याचे राज्य हया दोन्हीही राज्यशास्त्रीय संकल्पना स्वतंत्र व वेगवेगळया तसेच एकमेकांना पुरक अशाच स्वरूपाच्या आहेत. त्यांच्यात अतुट संबंध समजला जातो. भारतीय संविधान निर्मात्यांनी जगभरातल्या राज्यघटनांचा तौलानिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून विचारविमर्श करून लोकशाही शासनपध्दती व कायद्याचे राज्य हया संकल्पनाची तरतूद भारतीय संविधानात केल्या. लोकशाही पध्दतीचा प्रारंभ जगात सर्वप्रथम इंग्लडमध्ये झाला. इंग्लडच्या शासनव्यवस्थेचा ते एक महत्वाचे वैशिष्टये आहे. त्याचप्रमाणे लोकशाहीचा विकास ही इंग्लडमध्येच झाला. लोकशाही मुल्यांमध्ये स्वातंत्र्य, समानता, न्याय, बंधुत्व, व्यक्तीचे मुल्य, नागरीकांचे स्वातंत्र्य शासनाचे उत्तरदायीत्व हयांचा समावेश होतो. ही सर्व मुल्ये कायद्याव्दारे प्रस्थापित केलेली असल्यामुळे त्यामध्ये कायद्याचे राज्याच्या संकल्पनेचा समावेश झाला.

कायद्याचे राज्य हया संकल्पनेत सर्वश्रेष्ठत्व, कायदा सर्व सामाजिक, राजकीय अथवा आर्थीक हितसंबंधाचे नियमन करतो. प्रत्येक व्यक्तीच्या लहरीपणानूसार नव्हे तर त्या व्यक्तीचे कायद्याच्या संदर्भात काय स्थान यावरूनच कार्यप्रणाली राबविल्या जाते. त्याचप्रमाणे हया संकल्पनेत पुढील लक्षणे सांगितली आहेत.

१) कायद्यासमोर समानता
२) कायद्याचे सर्वश्रेष्ठत्व
३) शासकीय न्यायाधिकरणाचा अभाव
४) सर्वसाधारण न्यायालयांचा न्यायदानाचा अधिकार
५) व्यक्तीगत अधिकार हे न्यायालये व पार्लमेंट यांच्या मान्यतेतून निर्माण होतात. या व्यक्तीगत अधिकारात वैयक्तीक स्वातंत्र्य, चर्चास्वातंत्र्य, व भाषण स्वातंत्र्य यांचा समावेश केला आहे.

लोकशाहीत लोकांनी निवडुन दिलेल्या प्रतिनिधिमार्फत राज्यकारभार चालविला जातो. त्याचप्रमाणे लोकांनी आपल्या कृतीचे नियमन हे कायद्याच्या राज्यांव्दारे कायदेशीर असलेली कृती करावी असा भाग त्या संकल्पनेत येतो.

**ऐतिहासिक पार्श्वभुमी -**

General will is always right या असीच्या तत्वानूसार समाजात लोकांच्या इच्छेला प्राधान्य दिले पण त्या राज्यात कायद्याचे राज्य असेलच असं समजता येणार नाही. ज्याप्रमाणे लोकशाहीशिवाय कायद्याचे राज्य असू शकते त्याचप्रमाणे कायद्याशिवाय लोकशाही असू शकते. अनियंत्रित राजसत्ता किंवा अनियंत्रित लोकशाही यांमध्ये कायद्याचे राज्य या संकल्पनेला कोणतेही महत्व नाही. अनियंत्रित राजसत्तेमध्ये राजाची इच्छा अंतिम व महत्वपूर्ण समजली जाते. अनियंत्रित लोकशाहीमध्ये लोकांची, जनतेची सर्वमान्य इच्छेला महत्व असते. म्हणजेच राज्यात राजसत्ता व लोकेच्छा सर्वश्रेष्ठ असल्यास कायद्याच्या राज्य संकल्पनेशी विसंगती दिसून येतो.

**इतिहास -**

सिरेरोपासून ते थॉमस अॅक्वीनसपर्यंतच्या अनेक विचारवंतांनी कायद्याच्या संकल्पनेबाबत आपले मत मांडलेले आहे. कायद्याचे राज्य हि संकल्पना खुप जुनी आहे. सिसेरोने म्हटले आहे की, "आम्हाला स्वतंत्र राहता यावे म्हणून आम्ही कायद्याची गुलामी पत्करली

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 1.7604(UIF)
Volume-3, Issue- 2, March -2013 Available online at www. isrj.in

आहे." तेव्हापासून या संकल्पना सुरूवात झाली. इंग्लडमध्ये मात्र ही संकल्पना स्वतंत्रपणे उदयास आली. रोममध्ये हयाची अंमलबजावणी झालेली दिसून येत असली तरी त्यांनी ही संकल्पना कोणताही कायदा हा नैसर्गिक कायद्याविरूध्द असणार नाही. अशी मांडली परंतू तो सिध्दांत इंग्लडमधील विचारवंतांनी स्विकारला नाही. रोममधील विचारवंतांनी कायद्याचे राज्य ही संकल्पना जी स्विकारली त्याचा प्रमुख उद्देश हा राजाची अधिसत्ता बळकट करणे हाच होता हे स्पष्ट होते.

भारतामध्ये कायद्याचा राज्य हि संकल्पना इंग्रजांकडून स्विकारले असल्यामुळे त्यांनी ति संकल्पना ज्याप्रकारे रूजवली व तिचा विकास केला.

इंग्लंडमधील जॉन ज्युलमी कारभाराला कंटाळून तेथील सरदारांनी बंड केले व राजाचे अधिकार मॅग्ना कार्टा या सत हे व्दारे निमित्य केले. मॅग्नाकार्टा हा राजा त्यांच सरजामदार यांच्यामधील ता एक करार होता. या कराराव्दारे राजाने आपल्या वतनावरील अधिकार व न्यायालयीन अधिकार यावर मर्यादा घालून घेतली. अप्रत्य क्षतः त्याने जनतेच्या मालमत्तेचे व व्यक्तीस्थाने त्याचे अधिकार मान्य करून त्यांचा आदर राखण्याचे बंधन स्विकारले. घटना तज्ञांच्या मते राजाने या सनदेने राज्याच्या श्रेष्ठत्वापेक्षा कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य केले तेव्हापासून इंग्लडमध्ये खऱ्या अर्थाने कायद्याचे राज्य हि संकल्पना रूजली व त्या संकल्पनेचा विकासही झाला म्हणजेच इ.स.१२१५ मॅग्नाकार्टा हा इंग्लडच्या इतिहासातील कायद्याचे राज्य या संकल्पनेचा प्रारंभबिंदू होता. या सनदेने इंग्लडमधील सरजामदारांच्या हिताचे संरक्षण करून राजाला त्यांच्या संमत्तीशिवाय कोणताही नविन कर लावता येणार नव्हता.

कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेची सुसूत्र मांडणी डायसो या घटनातज्ञाने "लॉ ऑफ कॉस्टीटयुशन" या ग्रंथात त्याने पुढीलप्रमाणे केली.

१) कायद्यासमोर समानता
२) इतर सर्व तऱ्हेच्या विशेषाधिकारापेक्षा कायद्याचे श्रेष्ठत्व
३) शासकीय न्यायाधिकरणाचा अभाव
४) सर्वसाधारण न्यायालयांचा न्यायदानाचा अधिकार
५) व्यक्तीगत अधिकार हे न्यायालये व पार्लमेंट यांच्या मान्यतेतून निर्माण होतात.

या व्यक्तीगत अधिकारात वैयक्तीक स्वातंत्र्य, चर्चा स्वातंत्र्य व भाषण स्वातंत्र्य यांचा अंतर्भाव केला आहे.

कायदे करण्याची सत्ता पार्लमेंटला असल्यामुळे कायद्याचे राज्य म्हणजे पार्लमेंटचे सार्वभौमत्व असे समीकरण निघते. २० व्या शतकात सामाजिक अन्यायाची बोच वाढू लागली तेव्हा "कायदयाचे राज्य" या संकल्पनेतील त्रुटींची जाणीव निर्माण होवू लागली. १९५७ मध्ये शिकागो याठिकाणी झालेल्या "पाश्चात्य देशातील कायद्याचे राज्य" या विषयावरील जागतीक परिषदेतील चर्चासत्रात काही मुददे समोर आलेत.

१) कायद्याचे राज्य व व्यक्तीचे अधिकार अभिन्न आहे
२) व्यक्तीस्वातंत्र्य हा कायद्याच्या राज्याचा पाया आहे.
३) कायद्याच्या राज्यांचा खरा संबंध मानवी मुल्यांशी आहे. संस्थाशी नाही.
४) मानवी अधिकार, मुल्य, व्यक्तीस्वातंत्र्य, सरकारवर कायद्याचे नियंत्रण हयांचा समावेश कायद्याचे राज्य हया संकल्पनेत असावा.
५) सर्वसामान्य माणसांच्या हितसंबंधाशी पुरक हि संकल्पना असावी.

**भारतातील पार्श्वभुमी -**

भारतात कायद्याचे राज्य इंग्रजांनी आणले. म्हणजेच यापूर्वी भारतात कायदे अस्तित्वात नव्हते असे नव्हे. तर व्यक्तीला आपल्यावरील बेकायदा अन्याय दुर करून घेण्याचा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता एवढेच. हया संकल्पनेमुळे भारतात अतिशय महत्वाची गोष्ट घडली ती अशी की, बेकायदा अन्यायाविरूध्द न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार लोकांना मिळाला होता. त्याचप्रमाणे न्याय देणाऱ्या ज्या पारंपारिक संस्था होत्या त्या नष्ट होउन त्यांची जागा इंग्रजी न्यायालयाने घेतली होती. प्रत्येक तंटा हा न्यायालयामार्फत सोडविला जावू लागला. पुर्वी परमेश्वर व भाविक यांच्यातील दलाल म्हणून पुरोहीत वर्गाची यासंदर्भातील मक्तेदारी संपूष्टात आली.

१९२० पर्यंत कायदेमंडळात व न्यायालयाच्या मार्फत तंटे सोडविले जावू लागले. १९२० नंतर या चळवळीने नवे स्वरूप धारण केले. कायद्याच्या कक्षा रूंदावल्या गेल्या व भारतात लोकशाही पध्दती आणावी यासाठी जोर चढू लागला. सत्याग्रहासाठी कायद्याच्या ज्ञानाची गरज नसल्यामुळे बहुजनसमाज राजकारणात भाग घेवू लागला. लोकांना कायदा मोडण्याची शिकवण मिळाली व त्याचे दुष्परीणाम स्वातंत्र्यानंतर ठळकपणे पाहावयास मिळाले. १९४७ साली भारत स्वतंत्र्य झाल्यानंतर व १९५० साली संविधानाने संसदीय लोकशाही व कायद्याचे राज्य स्थापन केले. भारतीय संविधानात मुलभूत अधिकारात नागरी स्वातंत्र्याचा अंतर्भाव केला आहे. तर नागरीकांच्या काम करण्याचा अधिकार मार्गदर्शक तत्वात टाकला आहे. मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करून घेण्याचा अधिकार

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 1.7604(UIF)
Volume-3, Issue- 2, March -2013 Available online at www. isrj.in

नागरीकांना नाही. न्यायालयाचे स्वातंत्र्य मान्य केले असून दिर्घसुत्री न्यायपध्दतीचाच अवलंब केला आहे. सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकारप्रथा, प्रत्यावदन, बंदीप्रात्यक्षिकीकरण, परमापदेश यांची तरतुद केली आहे.

थोडक्यात सांगायचे झाल्यास १९ व्या शतकातील कायद्याच्या राज्याचा आदर्शसमोर ठेवून भारतीय संविधान तयार करण्यात आले आहे. मुलभूत अधिकार असले तरी त्याची अंमलबजावणी करून घेणे नागरीकांच्याच वर सोपवले आहे व अशा घटनेवर समस्या सोडविण्याचे काम सोपविले आहे.

कायद्याच्या राज्याच्या आधुनिक संकल्पनेप्रमाणे वैयक्तीक अधिकार व सार्वजनिक हितसंबंध यांच्यातील न्यायाच्या तत्वावर मेळ, सरकारवरील कायद्याचा वचक व मानवी मुल्य, या सर्वांचा संबंध कायद्याच्या राज्याशी येतो. अटकेपासून संरक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य वैगेरे अधिकार ही लोकशाहीची अमुल्य देणगी आहे. पण मुलभूत हक्कांचा वापर करून जर कोणी सार्वजनिक हितसंबंधात खीळ घालत असेल तर त्यावर कायद्याच्या राज्यानुसार बंधन घालणेच योग्य ठरते.

कायद्याचे राज्य खऱ्या अर्थाने अंमलात आणावयाचे असेल तर न्याय पचविण्याची क्षमता प्रत्येक व्यक्तीस असावयास हवी. पूर्वी अशी परिस्थिती होती की, एखाद्याने गाय मारली तर त्याचे वासरू दुस-याने मारावे हा न्याय होता. त्याप्रमाणे एखादया माणसाचा खुन झ ाला तर त्याचा बदला खुन करून मृतांच्या नातेवाईकांना घेता येत असे अशी अनेक उदाहरणे आहेत.

भारतात इंग्रजांनी लोकशाही व कायद्याच्या राज्यांची रूजवणूक व विकास केला. वर्तमान स्थिती भारतीयांची कठीण स्वरूपाची बनली आहे. दलितांवर व स्त्रियांवर अनभीज्ञ अत्याचार होत आहेत. भांडवलदार शोषण करित आहेत. कामगारपुढारी संघटनेच्या शक्तीचे प्रदर्शन मांडण्यात धन्य आहे. बेरोजगारीची समस्या मोठी झाली आहे. कुपोषण २१ व्या शतकातही उपस्थित आहे. शेतकऱ्यांची स्थिती दुष्काळमुळे वाईट आहे, त्यांनी पिकविलेल्या अन्न-धान्यांना हमी बाजारभाव नाही त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो आहे. कायद्याच्या राज्याचे आधारस्तंभ असलेला न्यायाविभागाचीही स्थिती म्हणावी तेवढी चांगली नाही. कायद्याचे राज्याचे पोलीस यांच्यावर तर महसुल विभागानंतर भष्ट्राचाराचे मोठे आरोप होतांना दिसून येतात. नोकरशाहीत लालफितशाही बेफीकीरपणा वाढलेला आहे. पक्ष प्रमुखांच्या इशाऱ्यावर कार्यकर्तै धिंगाणा घालून हिंसेला प्राधान्य देत आहे. विद्यार्थी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली देशाला बदनाम करित आहेत. प्राध्यापक, शिक्षक, अध्यापनाऐवजी रस्तावर येत आहेत. काही लेखक अश्यील लेखन करण्यात रममाण आहेत. म्हणजेच सामाजिक जाणिवेचा लोप होवून स्वार्थीवृत्ती वाढीस लागली. असहय लोकांना अधिकच त्रास होत आहे. आणि हे सर्व कायद्याच्या आधाराने चालू आहे.

**निष्कर्ष -**

हि सर्व परिस्थिती लोकशाहीला घातक आहे. कायद्याच्या राज्यांची संकल्पनेस न्याय मिळतो पण तेवढयाच पळवाटासुध्दा त्यात आहेत. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित केला आणि अत्यंत असहाय्य व्यक्तीला देखील अन्यायाबद्दल देशातील सर्वश्रेष्ठ सत्ताधाऱ्याला जाब विचारण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले तरच खऱ्या अर्थाने कायद्याचे राज्य स्थापन झाले असे होईल. नाही तर न्यायालयीन असहाय्यतेमुळे सुकर झालेल्या कायदेशीर अन्यायाचेच राज्य यापुढेही भारतात राहील.

**संदर्भ -**

१) लोकमत, लोकसत्ता, तरूणभारत, सकाळ, भाष्कर
२) त्रिवेदी आर. एन., रॉय, एम.पी. : भारतीय राजकीय व्यवस्था
३) जागरण इयर बुक
४) इंडिया इयर बुक
५) मनोरमा इयर बुक
६) जोशी प. ल. : भारतीय संविधान विकास, स्वरूप व राजकारण
७) सोहोनी प. : लोकशाही विक्रेंद्रीकरण
८) त्रिवेदी आर. एन., रॉय, एम.पी. : भारत सरकार एवं राजनीती
९) भोळे, भा.ल. : भारतीय राज्यव्यवस्था